शेक्सपीअरची नाटके व मराठी रूपांतरे

ंरगभूमी नियतकालिकाच्या वर्ष ५, अंक ९, ऑगस्ट १९१३ च्या अंकात, शेक्सपीअरचे मूळ इंग्रजी नाटक, त्याचे मराठी भाषांतर किंवा रूपांतर आणि भाषांतरकर्त्याचे नाव अशी यादी प्रसिद्ध झाली आहे. ती अधिक अभ्यासासाठी उपयुक्त ठरू शकेल असे वाटते म्हणून येथे दिली आहे. डॉ. मु. श्री. कानडे यांनी अशीच यादी अधिक सूक्ष्म व सखोल तपशीलासह आपल्या ‘ नाट्यशोध (नीहारा प्रकाशन, प्रथमावृत्ती, एप्रिल १९८७) या ग्रंथात दिलेली आहे. ती बहुमोल आहे. रंगभूमी नियतकालिकातील यादी व डॉ. कानडे यांनी नोंदविलेले ‘ शेक्सपीअरचे मराठी अवतार यातील फरकही येथे सांगितलेला आहे. डॉ. कानडे यांचा या संदर्भातील अभ्यास अद्ययावत् म्हणून मौलिक आहे. तर रंगभूमी नियतकालिकात, प्रथमच अशा स्वरूपाची यादी मराठीत दिली गेली हे संपादकांचे श्रेय आहे म्हणून हा तपशील देणे महत्त्वाचे वाटते.

रंगभूमी नियतकालिकातील यादी

शेक्सपीअरचे मूळ इंग्रजी नाटक	मराठी भाषांतर / रूपांतर	भाषांतरकार / रूपांतरकार
(१)Hamlet	१)विकारविलसित	गो. ग. आगरकर
	२) वीरसेन	गो. वा. कानिटकर
	३) हिंमतबहाद्दर	आनंदराव बर्वे
(२) Macbeth	१) मानाजीराव	श. म. परांजपे

२) डाकिनी विलास — ल. ना. जोशी

(३) King Lear — १) कन्या परीक्षण — गो. स. गोरे
२) अतिपीडचरित — शंकर मोरो
रानडे

(४) Othello — १) ऑथेल्लो — महादेवशास्त्री
कोल्हटकर
२) झुंझारराव — गोविंद बल्लाळ देवल

(५) Romeo and Juliet — १) रोमकेतु विजया — (विविध ज्ञान विस्तार)
२) मोहनतारा — के शव रामचंद्र छापखाने
३) शशिकला रत्नपाल । — ना. बा. कानिटकर
४) सं. ताराविलास — द. अं. केसकर
५) सं. शालिनी — त्रिं. बा. जोगळेकर
६) प्रेमाचा कळस — खंडो भिकाजी बेलसरे

(६) Timon of Athens — १) भूरिवसू — कानिटकर
२) विश्वामित्र — ---

(७) Titus Andronicus — ---------- — ----------
(८) Troilus and Cressida — ------------ — ------------

(९) Coriolanus — ------------- — -----------
(१०) Julius Caesar — १) विजयसिंह — का. गो. नातू
२) - — बेलसरे

(११) Pericles Prince of Tyre — प्रतापमुकुट — ब. रा. पाटील

(१२)Antony and Cleopatra १) वीरमणी आणि शृंगारसुंदरी ब. बा.
केळकर

२) शृंगारमंजिरी अ. वा. बरवे

(१३)King John (Tragedy) १) कपिध्वज ल. ना.
जोशी

(१४)Richard II (Tragedy) ---- ------

(१५)Richard III (Tragedy) १) जयाजीराव बी. रा.
नानल

२) -- हे. बा. आत्रे

(१६)King Henry IV 1st Part ------- -------------

(१७)King Henry IV 2nd Part -------- ---------------

(१८)King Henry V १) पंचम हेनरी ` बेलसरे

(१९) Henry VI 1st Part ---------- ------------

(२०) Henry VI 2nd Part ---------- -----------

(२१)Henry VI 3rd Part ---------- -----------

(२२) Henry VII ----------- -----------

(२३)Winter's Tale 1) मोहविलसित वि. मो.
महाजनी

२) सं. विकल्पविमोचन नेवाळकर

(२४) Taming of the Shrew १) त्राटिका वा. बा. केळकर

२) सं. कर्कशादमन त्रिं. बा. जोगळेकर

(२५) Measure for measure	१) सं. समानशासन	नेवाळकर
(२६) Merchant of Venice	१) मोहनेची अंगठी	द. गो. लिमये
	२) प्रणयमुद्रा	वि. सि. गुर्जर
	३) सं. सौदागर	मो. आगाशे
(२७) Merry Wives of Windsor	१) चतुरगडच्या विनोदी स्त्रिया	पी. जी. लिमये
(२८) Midsummer Night's Dreeam	१) मधुयामिनी स्वप्न	कृ. ना. आठले
	२) प्रेममकरंद	उकिडवे
	३) वेषविपर्यास	कृ . प. गाडगीळ
(२९) Much Ado about nothing	१) रजाचा गज	-----
	२) विरोधाभास	पां. बा. सहस्त्रबुध्दे
(३०) Loves Labours Lost	------------	--------------
(३१)All's Well that ends Well	१) वल्लभानुनय	महाजनी
(३२) As you like it	१) प्रेमगुंफा	नेवाळकर
(३३) Comedy of errors	१) भ्रांतिकृत चमत्कार	ब. रा. प्रधान
(३४) Cymbeline	१) तारा नाटक	महाजनी
	२) सं. तारा नाटक	शं. मो. रानडे
(३५) Tempest	१) —	वि. ज. कीर्तने
	२) तुफान	बेलसरे
(३६) Twelth Night or What you will	१) प्रियाराध	नेवाळकर
(३७) Two Gentlemen of Verona	१) कांतिपूरचे दोन गृहस्थ	-----

डॉ. कानडे यांनी शेक्सपीअरचे मराठी अवतार या शीर्षकाखाली आपल्या ‘ नाट्य-शोध या ग्रंथात खालील पद्धतीने माहिती दिली आहे.

शेक्सपीरची नाट्यकृती / लेखनकाल / प्रसिद्धीकाळ / मराठी रुपांतराचे नांव / रूपांतरकार
प्रकाशनकाल / पहिला प्रयोग / पहिला प्रयोग करणारी नाट्यसंस्था

डॉ. कानडे यांनी शेक्सपीअरची नाटके कालक्रमाने घेतलेली आहेत. त्यांचा लेखनकाल व प्रसिद्धीकाल दोन्ही दिलेला आहे. मराठी रूपांतरे व रूपांतरकार या बाबतीत रंगभूमी नियतकालिकातील यादी व डॉ. कानडे यांनी नोंदविलेली माहिती यात जिथे बदल आहे तो खाली दिला आहे. दोन्ही याद्यांमधील समान माहिती येथे नोंदविलेली नाही. मराठी रूपांतरित नाटकांचा प्रकाशनकाल, पहिला प्रयोग केव्हा झाला ती माहिती व पहिला प्रयोग करणाऱ्या नाट्यसंस्थेचे नाव, यापैकी कोणतीही माहिती रंगभूमी नियतकालिकाच्या यादीत नाही. ती डॉ. कानडे यांनी दिलेली आहे, पण येथे ती घेतलेली नाही. काही समकालीन रूपांतरांचा उल्लेख ‘ रंगभूमी तील यादीत नाही. पुढील काळातील उल्लेखही अर्थातच नाहीत.

(१) Hamlet 1) हिंमतबहाद्दर आनंदराव सखाराम बर्वे
(दानव खंडाचा राजपुत्र)
२) वीरसेन (किंवा विचित्रपुरीचा राजपुत्र) गोविंद वासुदेव कानिटकर
३) हॅम्लेट गणेश शिवराम उर्फ नाना जोग
(२) Macbeth १) राजमुकुट वि. वा. शिरवाडकर
(३)King Lear १) विकारविहार लक्ष्मण नारायण जोशी (अप्रकाशित)
२) मल्हारराव ?

३) सम्राट सिंह प्र. के. अत्रे १९७३
४) राजा लियर गो. वि. करंदीकर १९७५

(४) Othello ऑथेल्लो वि. वा. शिरवाडकर
१९६१

(५)Romeo and Juliet १) सं. शालिनी केशव विनायक करमरकर असे
लेखकाचे नाव देऊन
पुढे प्रश्नचिन्ह आहे.

२) प्रतापराव आणि मंजुळा एकनाथ विष्णु मुसळे
१८८२

(६)Timon of Athens १) अथेन्स येथील चिंतामण अनंत
लिमये
टायमन नावाचा उमराव
१८९६

(७) Troilus and Cressada १) टॅ्यल्स क्रेसिडा किरात, अप्रकाशित

(८)Julius Caesar १) ज्युलियस सीझर रामकृष्ण ता. पावसकर
१८८३

२) ज्युलियर सीझर माणिक ना. कुलकर्णी
१९५९

(९) Pericles, Prince of Tyre १) सुधन्वा कृष्णाजी वासुदेव
फडके
(मणिपूरचा राजा) १८८३

(१०) Tragedy of King Richard III १) जयाजीराव भास्कर रामचंद्र नानल
१८९१

२) सं. श्रीउदेजय वासुदेव पुरुषोत्तम साठे
(अत्रे यांचे नाव नाही) १९०४

(११)King Henry IV Part I १) बंडाचे प्रायश्चित्त नारायण गंगाधर
लिमये
१९१५

(१२)King Henry VIII १) राजा रघुनाथराव हणमंत
बापूराव अत्रे

अथवा आठवा हेन्री १९०४
(१३)Winter's Tale १) सं. संशय संभ्रम गजानन चिंतामण देव
१८९५
(१४)Taming of the Shrew १) सं. कर्कशादमन जगन्नाथ त्रिंबक
जोगळेकर
(१५) Measure for measure १) सुमतिविजय हरि नारायण आपटे
१९११
२) सं. सुमति शंकर विठ्ठल कुलकर्णी
१९०४
३) सं. झोटिंगपादशाहीवीर वामनराव जोशी १९३३
(अप्रकाशित)
(१६) Merchant of Venice १) स्त्रीन्यायचातुर्य ‶ आत्माराम वि.
पाटणकर
१८९९
२) व्हेनिसनगरचा व्यापारी खंडो भिकाजी
बेलसरे
१९१०
(१७) Mid Summer Night's Dream १) थोडक्यात चुकले गणेश गोविंद
तळवलकर
अथवा सं. सीता १८८९
२) मधुयामिनी स्वप्नदर्शन खंडो भिकाजी बेलसरे
१९१३
(वेषविपर्यास (गाडगीळ) या नाटकाचा उल्लेख डॉ. कानडे यांच्या
सूचीत नाही)
(१८) Much Ado about nothing १) रजाचा गज पांडुरंग गंगाधर
लिमये
(१९)All's Well that ends Well १) सं. प्रियाराधन ?
(२०)Comedy of Errors १) भुरळ अथवा आत्माराम
विनायक

ईश्वरीकृत लपंडाव पाटकर,
१८७६
२) सं. गड्या आपुला गाव बरा रामराव
नीळकंठ ओक
१९५९
(२१)Tempest मुक्त - मरुता भा. वि. वरेरकर,
अप्रकाशित
(२२) Twelth Night १) वेषविभ्रम कृष्णाजी परशुराम गाडगीळ
१८९१
२) भ्रमविलास बळवंत हरि पंडित
१९१३
३) प्रेमविनोद अनंत विठ्ठल आपटे १९१९
४) वाग्विलास विष्णु गणेश जोशी १९२८
(२३) Two Gentlemen of Verona १) कालिंदी दत्तात्रय अनंत आपटे
१८९८

याखेरीज अगदी अलीकडच्या दोन नाट्यप्रयोगांची माहिती या ठिकाणी देणे आवश्यक वाटते.

१) Othello चे ऑथेल्लो याच नावाने श्री. अरुण सरनाईक यांनी रूपांतर केले असून ते अप्रकाशित आहे, परंतु त्याचा प्रयोग १९८८ मध्ये आंतर नाट्य संस्थेने केला आहे.

२) Mid Summer Night's Dream चे ‘ऐन वसंतात अर्ध्या रात्री या नावाने श्री. राजीव नाईक यांनी रूपांतर केले आहे. तेही अप्रकाशित आहे. परंतु त्याचा प्रयोग १२ जानेवारी १९९१ ला गोवा हिंदु अॅसोसिएशन या संस्थेने केला.